महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर

सेक्टर२७, मिहान पुनर्वसन वसाहत खापरी, नागपूर- ४४११०८(महाराष्ट्र)

e-mail: principal.gcoenagpur@dtemaharashtra.gov.in • office.gcoenagpur@dtemaharashtra.gov.in

दुरध्वनी क्र. (०७१०३) २९५२२६(P), २९५२२०(O) •Website: www.gcoen.ac.in

"To be an Institution of National Repute Creating Globally Competent Technocrats to Serve the Society"

क्र.शाअमना/शिष्यवृत्ती/2023/6038 दिनांक : 5 DEC 2023

## महत्वाची सुचना – 3

**विषय : शैक्षणिक वर्ष 2023-2024 ला प्रथम, व्दितीय, तृतीय व चतुर्थ वर्ष प्रवेशित सर्व प्रवर्गाच्या विदयार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशिप/ई.बी.सी/इ.डब्ल्यु.एस/पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनेचे अर्ज भरणे/अर्ज RENEW करण्याबाबत.**

**संदर्भ : 1. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.** 18/तंशिसं/डीबीटी/विकाप/2023-24/243, दिनांक 20/10/2023.

**2. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र.** तंशिस/विकाना/डीबीटी/पोर्टल/शिष्य./2023-24/3364, दिनांक 15/10/2023.

प्रथम, व्दितीय, तृतीय चतुर्थ व थेट व्दितीय वर्ष प्रवेशित (1,2,3,4 & DSY Year B.Tech) ST/SC/OBC/SBC/VJNT/EBC/MINORITY/OPEN/SEBC या प्रवर्गाकरीता विदयार्थ्यांना सुचित करण्यात येते की, चालु शैक्षणिक वर्ष 2023-2024 करीता आपले सरकार, महाडिबीटी प्रणालीवरील सुचनेनुसार दिनांक 15/11/2023 ते 31/12/2023 या कालावधीत सर्व योजनांचे नविन तसेच नुतनीकरण अर्ज भरणे सुरु झालेले आहेत. तसेच 2022-2023 चे विदयार्थ्यांनी लॉगीनला त्रृटींची पुर्तता करण्याकरीता पाठविलेले शिष्यवृत्ती/फ्रिशिप/ई.बी.सी/इ.डब्ल्यु.एस/पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता/MINORITY चे अर्ज REAPPLY OPTION उपलब्ध असल्यास दिनांक 30/11/2023 पर्यंत REAPPLY करायचा आहे.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र विदयार्थ्यांनी www.mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी (registration ) करावे. **नोंदणी करण्याकरीता आपला भ्रमणध्वनी क्रमांक MOBILE NUMBER आधारकार्डशी जोडणे तसेच स्वत: विदयार्थ्यांचे नावे पोस्ट ऑफिस मध्ये खाते उघडून त्यास आधारकार्डशी जोडणे (LINK करणे) आवश्यक आहे.** मागील वर्षी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरलेल्या विदयार्थ्यांना पुन्हा नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. नोंदणी नंतर तयार झालेल्या आय.डी. व पासवर्डचा वापर करुन विदयार्थ्यांनी पात्र असलेल्या योजनेचा लाभ घेण्यासाठी www.mahadbtmahait.gov.in या वेबसाईटचे माध्यमातून ऑनलाईन स्वरुपात अर्ज करावे.



Scanned with OKEN Scanner

➢ **योजनेचे निकष :**

1) पोस्ट मॅट्रीकोत्तर भारत सरकार शिष्यवृत्ती 1.50 लाख उत्पन्न मर्यादा/फ्रिशीप 1.50 ते 8 लाख उत्पन्न मर्यादा सामाजिक न्याय विभाग (OBC/SBC/VJNT प्रवर्गाकरीता)
2) पोस्ट मॅट्रीकोत्तर भारत सरकार शिष्यवृत्ती 2.50 लाख उत्पन्न मर्यादा/फ्रिशीप 2.50 लाखपेक्षा अधिक ते उत्पन्न मर्यादा नाही सामाजिक न्याय विभाग (SC/ST प्रवर्गाकरीता)
3) राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग (खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचे पाल्य (OPEN/EWS/EBC/SEBC)
4) डॉ. पंजाबराव वसतीगृह निर्वाह भत्ता योजना, उच्च व तंत्रशिक्षण विभाग (खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक OPEN/EWS/EBC/SEBC अल्पभुधारक/मनरेगा नोंदणीकृत रोजगार चे पाल्य)
5) राज्य शासन अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग (मुस्लिम/शिख/जैन/पारसी/ख्रिश्चन/नवबौध्द)

➢ **आवश्यक कागदपत्रे :**

1) आधारकार्ड 2) इंडियन पोस्टल पेमेंट चे बँक खाते 3) 10वी/ 12वी व मागील वर्षी उत्तीर्ण सर्व SEMESTER च्या ORIGINAL MARKSHEET किंवा विभागप्रमुखाने साक्षांकित केलेल्या MARKSHEET 4) CAP ID LETTER ADMISSION INCHARGE यांच्या सहीचे 5) 2022-2023 वर्षाचे तहसिलदाराचा सही शिक्का असलेले उत्पन्न प्रमाणपत्र (आईचे उत्पन्न प्रमाणपत्र लावत असल्यास वडील हयात नसल्याचे प्रमाणपत्र/फारकत प्रमाणपत्र विभक्त कुटुंबाचे प्रमाणपत्र ई. 6) अधिवास प्रमाणपत्र 7) रेशन कार्ड 8) टी. सी. 9) जात प्रमाणपत्र 10) शिष्यवृत्ती/फ्रिशिप धारक विदयायार्थ्याकरीता जातवैधता प्रमाणपत्र आवश्यक 11) अपंग विदयार्थ्यांकरीता अपंगत्वाचे प्रमाणपत्र 12) वडीलांचे प्रतिज्ञापत्र 13) वसतीगृहात प्रवेशित विदयार्थ्यांनी वसतिगृहात राहत असल्याचे प्रमाणपत्र 14) डॉ. पंजाबराव वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेचा लाभ घेत असलेल्या विदयार्थ्यांना अल्पभुधारक किंवा मनरेगा नोंदणीकृत रोजगाराचे प्रमाणपत्र, वसतीगृह कुलमंत्रीचे प्रमाणपत्र, बाहेर कीरायाने राहत असल्यास घरमालकाचे STAMP PAPER वर BOND कालावधी नमूद करुन, घरमालकाचे आधारकार्ड व पॅनकार्ड, नोडल अधिकारी शिष्यवृत्ती, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर यांचे प्रमाणपत्र इ. कागदपत्रे 256KB साईजचे आत PDF/JPEJ FORMAT मध्ये SCANNER वर स्कॅन करुन अपलोड करावे. (मोबाईल मधून डॉक्युमेंटस स्कॅन करु नये.)

➢ **टिप :**

1) सदर शैक्षणिक वर्षात जे शिष्यवृत्ती/फ्रिशिप धारक विदयार्थी जे शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरणार नाही अथवा ज्यांचे अर्ज नामंजूर होईल अशा विदयार्थ्यांनी त्या वर्षाची शैक्षणिक शुल्काची रक्कम भरणे बंधनकारक राहील आणि ही सर्वस्वी जबाबदारी विदयार्थ्यांची राहील.
2) शिष्यवृत्ती/फ्रिशिप धारक विदयार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरल्यानंतर तो स्वत: वेळोवेळी Log In करुन अर्जाची स्थिती पाहणे, अर्ज त्रृटीमध्ये आल्यास त्रृटीची पुर्तता करुन पुन्हा REAPPLY करणे, अर्ज मंजूर झाल्यानंतर REEDEM करणे ही सर्वस्वी जबाबदारी विदयार्थ्यांची राहील.



Scanned with OKEN Scanner

3) पदवि अभ्यासक्रम पुर्ण करताना अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत प्रथम वर्ष प्रवेशित विदयार्थ्यांना केवळ चार वर्ष तसेच थेट व्दितीय वर्ष प्रवेशित विदयार्थ्यांना केवळ तीनच वर्ष वरीलयोजनेचा लाभ घेता येईल EXTRA YEAR लागणा-या विदयार्थ्यांना त्या वर्षाला शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा लाभ घेता येणार नाही.

4) **ST/SC हे प्रवर्ग वगळुन** इतर सर्व प्रवर्गातील ज्या विदयार्थ्यांच्या पालकाची उत्पन्न मर्यादा 8 लाख पेक्षा जास्त असेल त्यांना कुठल्याही योजनेचा लाभ घेता येणार नाही तसेच संबंधित विदयार्थ्यास प्रत्येक वर्षास पुर्ण फी भरणे अनिवार्य राहील याची विदयार्थ्यांनी व पालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

5) **TFWS** मधुन प्रवेशित विदयार्थ्यांना पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजने व्यतिरीक्त अन्य कुठलाही लाभ घेता येणार नाही. अन्य सवलतीस Apply केल्यास अर्ज रदद करण्यात येईल, तसेच रक्कम अदा झाल्यास वसुल करण्यात येईल.

6) **Against CAP (EWS)** मधुन प्रवेशित विदयार्थ्यांना कोणत्याही शिष्यवृत्ती/फ्रिशिप चा लाभ घेता येणार नाही.

7) **Against CAP (ST/SC)** मधुन प्रवेशित विदयार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरायचा आहे. परंतु शिष्यवृत्ती/फ्रिशिप मंजूर न झाल्यास संबंधित विदयार्थ्यास प्रत्येक वर्षाची पुर्ण फी भरणे अनिवार्य राहील. याची विदयार्थ्यांनी व पालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

8) **Against CAP (OBC/SBC/VJNT)** मधुन प्रवेशित विदयार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरायचा आहे. परंतु शिष्यवृत्ती/फ्रिशिप मंजूर न झाल्यास संबंधित विदयार्थ्यास प्रत्येक वर्षाची पुर्ण फी भरणे अनिवार्य राहील. याची विदयार्थ्यांनी व पालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

नोडल अधिकारी शिष्यवृत्ती,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,
नागपुर

प्रबंधक,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,
नागपुर

प्रत : 1) सर्व प्रवेशित विदयार्थी, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता, देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या पालकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

2) प्रोग्रामर, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर यांना महाविदयालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्याकरीता.

3) विदयार्थी विभाग, सुचना फलक शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर.

4) सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरची सुचना विभागाच्या सुचना फलकावर लावून तसेच विभागाच्या Whatsapp Group व्दारे आपल्या विभागातील विदयार्थ्यांना निदर्शनास आणून दयाव्यात.

Scanned with OKEN Scanner